बुधवार दि. २९ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शनी मंदिर चौकात पुन्हा वाहतूक कोंडी; वाहतूक पोलिसांचा पत्ताच नाही!

### दुपारी तब्बल तासभर वाहनांच्या रांगा; नागरिकांचा संताप, कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या शनी मंदिर चौकात मंगळवारी दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास पुन्हा एकदा भीषण वाहतूक कोंडी झाली. सुमारे अर्धा ते एक तास या चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विशेष म्हणजे, एवढी गंभीर वाहतूक कोंडी असतानाही घटनास्थळी एकही वाहतूक पोलीस कर्मचारी दिसून आला नाही. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी आणि पादचाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. शनी मंदिर चौक हा शहरातील प्रमुख मार्गांना जोडणारा महत्त्वाचा चौक असून, येथे दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा असते. तरीही वाहतूक नियोजनाचा अभाव आणि वाहतूक पोलिसांची अनुपस्थिती यामुळे या चौकात वारंवार कोंडीची समस्या निर्माण होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. विशेषतः दुपारच्या आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत या चौकातून मार्ग काढणे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रुग्णवाहिका, शालेय वाहने तसेच अत्यावश्यक सेवांनाही या कोंडीचा फटका बसत असल्याचे वाहनचालकांनी सांगितले.

नागरिकांच्या मते, शनी मंदिर चौकातील ही परिस्थिती नवीन नसून अनेक दिवसांपासून कायम आहे. मात्र, वाहतूक


(छायाचित्र - किरण खानापुरे)

शाखेकडून केवळ अधूनमधून कारवाई केली जाते; नियमित नियोजन आणि कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने समस्या अधिकच गंभीर होत आहे.

नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे गर्दीच्या वेळेत नियमित वाहतूक पोलीस तैनात करावेत, अतिक्रमणांवर कारवाई करावी, बेशिस्त पार्किंगवर नियंत्रण ठेवावे आणि आधुनिक वाहतूक व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे.

प्रश्न प्रशासनाला... गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलीस कुठे असतात? वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय कधी होणार?

शनी मंदिर चौकासाठी स्वतंत्र वाहतूक नियोजन का नाही?

शहरातील वाढती वाहनसंख्या लक्षात घेता, शनी मंदिर चौकातील वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोय नसून नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न बनत चालली आहे. त्यामुळे वाहतूक पोलीस प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रभावी उपाययोजना करणे काळाची गरज बनली आहे.

## पाण्याच्या ६ मोटारींसह दोन चोरटे गजाआड

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याच्या मोटारींच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर अंबड पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन सराईत चोरट्यांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून चोरीच्या ६ पाण्याच्या मोटारी, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि एकूण ₹१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मोटार चोरीच्या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला (डीबी स्क्वॉड) विशेष सूचना देऊन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांवर पाळत ठेवत दोन इसमांना ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपींनी आपली नावे रमेश त्र्यंबक वाघ (रा. वाघलखेडा, ता. अंबड, जि. जालना) आणि विठ्ठल सर्जेराव मिसाळ (रा. दुधना काळेगाव, ता. अंबड, जि. जालना) अशी सांगितली. पोलिसांनी कसून चौकशी केली असता दोघांनीही शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याच्या मोटारी चोरी केल्याची कबुली दिली.

**पानेगाव रोडवरील शेतातून चोरीचा ऐवज जप्त**

**₹१ लाखांचा मुद्देमाल जप्त**

चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल तसेच चोरी केलेल्या सहा पाण्याच्या मोटारी पानेगाव रोडवरील एका शेतात लपवून ठेवल्याची माहिती दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत चोरीच्या सर्व मोटारी आणि मोटारसायकल जप्त केली.

या कारवाईत पोलिसांनी ६ पाण्याच्या मोटारी आणि गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल, असा एकूण ₹१ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईमुळे मोटार चोरीचा किमान एक गुन्हा उघडकीस आला असून आरोपींकडून आणखी अनेक चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**शेतकरी वर्गातून समाधान**

शेतीसाठी पाण्याच्या मोटारी अत्यंत महत्त्वाच्या असल्याने अशा चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत होते. अंबड पोलिसांनी तातडीने तपास करून आरोपींना अटक केल्याने शेतकरी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. चोरीचा मुद्देमालही जप्त करण्यात आल्याने संबंधित शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**पुढील तपास सुरू**

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार राधाकृष्ण जायभाये करीत असून आरोपींकडून आणखी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**


ही (पान २ वर)

## गायत्री परिवारातर्फे गुरु पौर्णिमेनिमित्त आज सामूहिक गायत्री मंत्रदीक्षा सोहळा

**जालना - प्रतिनिधी**

अखिल विश्व गायत्री परिवार, शांतिकुंज हरिद्वार यांच्या मार्गदर्शनाखाली गायत्री परिवार जालनाच्यावतीने गुरु पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त बुधवार दि. २९ जुलै रोजी सकाळी १० वाजता डॉ. राजेंद्रप्रसाद रोडवरील रामदेवबाबा मंदिरात निःशुल्क सामूहिक गायत्री मंत्रदीक्षा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षी अखिल विश्व गायत्री परिवार, शांतिकुंज, हरिद्वारच्यावतीने 'मातृशक्ती जन्मशताब्दी वर्ष' तसेच 'अखंड ज्योती शताब्दी वर्ष' विविध आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरे करण्यात येत आहे. यानिमित्ताने गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून जालना गायत्री परिवाराच्यावतीने गायत्री महामंत्र



दीक्षा समारोह व गायत्री महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

गायत्री मंत्र हा सद्बुद्धी, सद्विचार आणि आत्मिक उन्नतीचा महामंत्र मानला जातो. वेदमूर्ती, तपोनिष्ठ पं. श्रीराम शर्मा आचार्य यांनी गायत्री साधनेचा व्यापक प्रसार करून समाजात संस्कार, सद्विचार आणि आध्यात्मिक चेतना जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी गायत्री मंत्राचे २४ महापुरश्चरण केले असून विविध विषयांवर तीन हजारांहून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या सूक्ष्म मार्गदर्शन व संरक्षणात हा आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहे. सहभागी होण्यासाठी नोंदणी करावी. या आध्यात्मिक उपक्रमात महिला-पुरुष, युवक-युवती तसेच कुटुंबीयांना सहभागी होता येणार आहे. अधिक माहितीसाठी ७४९८५८५८३०, ८७८८३८६७६६ या क्रमांकावर संपर्क साधून, या पवित्र उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गायत्री परिवार जालनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## भोकरदन पोलिसांची धडाकेबाज कामगिरी; मध्य प्रदेशातून ₹८.८० लाखांची चोरीची रक्कम हस्तगत

### सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे तीन आरोपी जेरबंद; नागरिकांना पोलिसांचे सतर्कतेचे आवाहन

**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन शहरातून चोरीस गेलेल्या रोख रकमेच्या गुन्ह्याचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत भोकरदन पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मध्य प्रदेशात सापळा रचून पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातून ₹८ लाख ८० हजारांची रोख रक्कम हस्तगत केली आहे. सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढत ही कारवाई करण्यात आली.

पोलीस ठाणे भोकरदन येथे २३ जुलै २०२६ रोजी फिर्यादी बबीता भागाजी इच्छे (वय ४०, रा. कोठा जहागीर) यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या जय योगेश्वर बचत गटाच्या खात्यातील भारतीय स्टेट बँकेतून काढलेले ₹९ लाख त्यांनी पिकअप वाहन (क्र. -२१--०५०४) च्या केबिनमध्ये ठेवले होते. त्यानंतर भोकरदन-जाफ्राबाद मार्गावरील रत्नमाला लॉन्स परिसरात वाहन थांबवून त्या व त्यांच्यासोबतचे साक्षीदार चहा पिण्यासाठी गेले असता अज्ञात चोरट्यांनी वाहनाच्या डाव्या बाजूची काच फोडून केबिनमधील रोख रक्कम चोरून नेली होती. घटनेची गंभीर दखल घेत उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर



आणि पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत विशेष तपास पथक स्थापन केले. तपासादरम्यान परिसरातील तसेच बँकेतील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करण्यात आली. फुटेजमधील संशयितांचे फोटो मिळाल्यानंतर गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.

प्राथमिक तपासात आरोपी मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील गुलखेडी परिसरातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस अधीक्षकांची परवानगी घेऊन सहायक पोलीस निरीक्षक राहुल बांगर, पोलीस अंमलदार संतोष बनकर आणि संदीप भुतेकर यांचे विशेष पथक मध्य प्रदेशात रवाना करण्यात आले. तेथे सापळा रचून आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत**

१. राहुल उत्तम सिसोदिया (वय २२, रा. गुलखेडी, ता. पचोर, जि. राजगड, मध्य प्रदेश)

२. कालू उर्फ शिवप्रसाद सिसोदिया (रा. कडिया (सांसी), ता. पचोर, जि. राजगड)

३. कल्लू उर्फ जगप्रकाश सांसी (वय (पान २ वर)

## पंचमुखी महादेव मंदिर परिसरातील रस्ते, स्वच्छता व कुंडलिका नदी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

### नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले व नगरसेविका पूजा भगत यांचे आयुक्तांना निवेदन; खड्डे बुजविणे, डांबरीकरण, नदी प्रदूषण रोखणे व मंदिर परिसर स्वच्छतेची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील पंचमुखी महादेव मंदिर परिसरातील पाणीपुरवठा पाइपलाइन दुरुस्तीनंतर रस्त्यावर पडलेले खड्डे, कुंडलिका नदीतील वाढते प्रदूषण आणि मंदिर परिसरातील अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला असून, या सर्व समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक दुर्गेश किशनलाल काठोठीवाले आणि नगरसेविका पूजा दिनेश भगत यांनी जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पंचमुखी महादेव मंदिराजवळ काही दिवसांपूर्वी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत पाणीपुरवठा पाइपलाइन दुरुस्तीचे काम करण्यात आले. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर खोदकाम केलेल्या ठिकाणी केवळ माती टाकून खड्डे भरले गेले असून, रस्त्याचे डांबरीकरण किंवा गट्टू बसवून रस्ता पूर्ववत करण्यात आलेला नाही. त्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. विशेष म्हणजे, या कामाबाबत जबाबदारी निश्चित करण्याऐवजी महानगरपालिकेचे पाणीपुरवठा व बांधकाम विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. पाणीपुरवठा विभागाकडून हे काम बांधकाम विभागाचे असल्याचे सांगितले जात आहे, तर बांधकाम विभागाकडून उलट भूमिका घेतली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

**कुंडलिका नदीत हॉटेलमधील कचरा; प्रदूषणाचा गंभीर प्रश्न**

निवेदनात कुंडलिका नदीच्या प्रदूषणाचा मुद्दाही ठळकपणे मांडण्यात आला आहे. गरीबशहा बाजार परिसरातील काही हॉटेल व्यावसायिकांकडून अन्नकचरा आणि सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याचे निदर्शनास आल्याचे नगरसेवकांनी म्हटले



आहे. पंचमुखी महादेव मंदिरालगतून वाहणाऱ्या या नदीत निर्माण होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून धार्मिक स्थळाचे पावित्र्य, पर्यावरण आणि भाविकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित हॉटेल व्यावसायिकांवर तात्काळ कारवाई करून नदीतील प्रदूषण रोखण्याची मागणीही करण्यात आली आहे.

**मंदिर परिसर आणि मैदानात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी**

पंचमुखी महादेव मंदिर परिसरातील मोकळ्या मैदानात मोठ्या प्रमाणावर कचरा व घाण साचल्यामुळे परिसर अस्वच्छ झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे तातडीने विशेष स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण मैदान, मंदिर परिसर आणि आसपासचा भाग स्वच्छ करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, लोढी मोहल्ला येथील लक्ष्मी माता मंदिर परिसरातही तातडीने स्वच्छता करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागल पांडू उत्सव लवकरच होणार असल्याने या परिसरात मोठ्या संख्येने भाविक येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसराची साफसफाई, निर्जंतुकीकरण आणि नियमित स्वच्छतेची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**श्रावण महिन्यात भाविकांची वाढती गर्दी; प्रशासनाने तातडीने कारवाई करावी**

सध्या पवित्र श्रावण महिना सुरू असल्याने पंचमुखी महादेव मंदिरात दररोज, विशेषतः सोमवारी, मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. आगामी धार्मिक कार्यक्रम आणि बागल पांडू उत्सवामुळे भाविकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत रस्त्यावरील खड्डे, अस्वच्छ परिसर आणि नदीतील प्रदूषणामुळे भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो तसेच अपघात आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती नगरसेवकांनी व्यक्त केली आहे. या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागांना तातडीने निर्देश द्यावेत, रस्त्यावरील खड्डे गट्टू टाकून डांबरीकरणासह पूर्ववत करावेत, कुंडलिका नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी तसेच पंचमुखी महादेव मंदिर परिसर, मैदान आणि लोढी मोहल्ला येथील लक्ष्मी माता मंदिर परिसराची तातडीने स्वच्छता करून नियमित देखभालीची व्यवस्था करावी, अशी मागणी नगरसेवक दुर्गेश किशनलाल काठोठीवाले आणि नगरसेविका पूजा दिनेश भगत यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

# संपादकीय....

## आता आंतरराष्ट्रीय क्षितिज गाठण्याची वेळ

उत्तर प्रदेशातील नोएडा येथे झालेल्या राष्ट्रीय यूथ गेम कराटे चॅम्पियनशिपमध्ये जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी ११ सुवर्ण, ५ रौप्य आणि ७ कांस्य अशी तब्बल २३ पदके पटकावत जिल्ह्याच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असे यश संपादन केले आहे. हा केवळ पदकांचा आकडा नाही, तर जिद्द, शिस्त, कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शन यांच्या संगमातून उभे राहिलेले यश आहे. या यशामुळे जालना जिल्हा केवळ औद्योगिक, कृषी किंवा राजकीय क्षेत्रापुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय क्रीडा नकाशावरही ठळकपणे उमटला आहे.

जालना हा पारंपरिक अर्थाने मोठ्या क्रीडा सुविधा असलेला जिल्हा मानला जात नाही. तरीही मर्यादित साधनसामग्री, अपुऱ्या सुविधा आणि अनेक अडचणींवर मात करत येथील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली. ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. प्रत्येक सुवर्णपदकामागे हजारो तासांचा सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे त्याग आणि खेळाडूंचा आत्मविश्वास दडलेला असतो. त्यामुळे या यशाचा सन्मान हा केवळ खेळाडूंचाच नसून त्यांच्या कुटुंबीयांचा, प्रशिक्षकांचा आणि संपूर्ण जालना जिल्ह्याचा आहे. सेन्साई रुपेंद्र गोपाल पारचा यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सातत्यपूर्ण कामगिरी केली. यावरून एक गोष्ट स्पष्ट होतेयोग्य प्रशिक्षक, नियोजनबद्ध सराव आणि सातत्य यांची सांगड घातली तर ग्रामीण भागातील मुलेही राष्ट्रीय स्तरावर यश मिळवू शकतात. हीच बाब इतर क्रीडा प्रकारांसाठीही प्रेरणादायी आहे. विजेत्या खेळाडूंचे महापौर वंदना मगरे, नगरसेवक अक्षय गोरंट्याल आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झालेले स्वागत निश्चितच कौतुकास्पद आहे. समाज आपल्या खेळाडूंचा सन्मान करतो, तेव्हा त्या सन्मानातून पुढील पिढीला प्रेरणा मिळते. मात्र, सत्कार हा शेवट नसून तो पुढील प्रवासाची सुरुवात असली पाहिजे. खेळाडूंना केवळ टाळ्या नव्हे, तर सातत्यपूर्ण सुविधा, आर्थिक मदत, आधुनिक प्रशिक्षण, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी प्रायोजकत्व आणि दर्जेदार क्रीडा पायाभूत सुविधा मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. आज अनेक गुणवंत खेळाडू आर्थिक अडचणींमुळे किंवा सुविधांच्या अभावामुळे मध्येच खेळ सोडतात. काहींना स्पर्धांसाठी प्रवास खर्च उचलणे कठीण जाते, तर काहींना आधुनिक प्रशिक्षणाची संधी मिळत नाही. अशा परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा प्रशासन, उद्योग क्षेत्र, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे जिल्हास्तरीय क्रीडा विकास आराखडा तयार करण्याची गरज आहे. गुणवंत खेळाडूंना शिष्यवृत्ती, क्रीडा साहित्य, विमा संरक्षण आणि नियमित प्रशिक्षणाची हमी मिळाली, तर जालन्यातून अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडू शकतात. या यशातून आणखी एक महत्त्वाचा संदेश मिळतो. मोबाईल, सोशल मीडियाचे वाढते आकर्षण आणि बैठ्या जीवनशैलीच्या काळात कराटेसारख्या खेळांकडे युवक-युवतींचा वाढता कल हा समाजासाठी सकारात्मक संकेत आहे. कराटे केवळ पदके जिंकण्याचा खेळ नाही; तो शिस्त, आत्मविश्वास, मानसिक ताकद, स्वसंरक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. विशेषतः मुलींसाठी स्वसंरक्षणाच्या दृष्टीने कराटेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. विजयी रॅलीदरम्यान नागरिकांनी केलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि पावसाच्या सरींनी जणू विजेत्यांचे केलेले स्वागत हे या यशाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित करणारे चित्र होते. समाज जेव्हा आपल्या खेळाडूंचा अभिमानाने गौरव करतो, तेव्हा त्या गौरवातून नवे स्वप्न, नवी उमेद आणि नवे विजेते जन्म घेतात. राष्ट्रीय स्तरावरील हे यश आता अंतिम ध्येय नसावे. पुढचे लक्ष्य आशियाई, राष्ट्रकुल, जागतिक आणि ऑलिम्पिक स्पर्धांचे असले पाहिजे. त्यासाठी नियोजन, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि दीर्घकालीन क्रीडा धोरण आवश्यक आहे. जालना जिल्ह्याच्या कराटेपटूंनी सिद्ध करून दाखवले आहे की, प्रतिभेला मोठ्या शहरांची गरज नसते; गरज असते ती संधी, योग्य मार्गदर्शन आणि अविरत मेहनतीची. या सुवर्ण यशाचे रूपांतर भविष्यात आंतरराष्ट्रीय यशात झाले, तर तो दिवस केवळ जालना जिल्ह्यासाठी नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा ठरेल.

# गुरु पौर्णिमा

आज गुरुपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्याप्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं. गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ठ्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे. गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच

गुरुर ब्रह्मा।<br>
गुरुर विष्णू।<br>
गुरुर देवो<br>
महेश्वरा।<br>
गुरू साक्षात परब्रह्म।<br>
तस्मई श्री गुरू देव नमः

अशी आपण गुरूंची ओळख करून देतो. गुरू म्हणजे काय ? गुरूंचे महत्व काय? आपल्या जीवनात गुरूंचे असणे म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो.

गुरू हा संतकुळीचा राजा।<br>
गुरू हा प्राण विसावा माझा।<br>
गुरुविण देवपूजा पाहत नाही त्रैलोकी।

वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही.

माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील. आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात.आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात.

म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट.

त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग,डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.

**श्याम बसप्पा ठाणेदार**<br>
**दौंड जिल्हा पुणे**<br>
**९९२२५४६२९५**

# चांगले मार्गदर्शन,प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला 'गुरू'

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील ''पौर्णिमा''साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे.त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण ''गुरू शिवाय ज्ञान नाही''ही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.''आई-वडिल'' हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र- आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई- वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे. ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घडली तर आपण ''आईग'' म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दुःख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण ''बापरे'' म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो.अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे हे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो.त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई- वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच!यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते व पहाडासारखा उभा रहातो.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दुःखाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो.तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते.आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू-शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो.तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात.आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते.म्हणुनच म्हटल्या जाते ''गुरू बिना ज्ञाण अधुरा''. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे, होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते.ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रितपणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते.त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.''आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी''. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की बदलते हवामान व देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



**रमेश कृष्णराव लांजेवार.**<br>
**( स्वतंत्र पत्रकार )**<br>
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

## पीकस्पर्धा २०२६ : शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी; राज्यस्तरावर ₹५० हजारांपर्यंत बक्षीस

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागाने खरीप हंगाम २०२६ मधील अन्नधान्य, कडधान्य आणि गळीतधान्य पिकांच्या पीकस्पर्धेसाठी ऑनलाइन अर्ज मागविले आहेत. यंदापासून अर्ज प्रक्रिया स्वतंत्र ऑनलाइन पोर्टलद्वारे राबविण्यात येत असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक श्री. सुनील वानखेडे यांनी केले आहे. यावर्षीच्या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या ११ खरीप पिकांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरांवर होणार असून, सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी स्वतंत्रपणे विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तालुका स्तरावर प्रथम ₹५,०००, द्वितीय ₹३,००० आणि तृतीय ₹२,०००, जिल्हा स्तरावर प्रथम ₹१०,०००, द्वितीय ₹७,००० आणि तृतीय ₹५,०००, तर राज्य स्तरावर प्रथम ₹५०,०००, द्वितीय ₹४०,००० आणि तृतीय ₹३०,००० इतकी बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. मूग व उडीद पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६, तर भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ ही अंतिम तारीख आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अर्जदाराच्या नावावर जमीन असणे, ती स्वतःच्या ताब्यात व लागवडीखाली असणे आणि आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या पीक स्पर्धा नोंदणी पोर्टलवरून अर्ज करावा. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

पान १ व ४ वरुन...

### पाण्याच्या ६...

कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे, पोलीस हवालदार यशवंत मुंडे, दीपक पाटील, राधाकृष्ण जायभाये तसेच पोलीस शिपाई अरुण मुंडे, तुकाराम मदन आणि सुनील वैद्य यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

### भोकरदन पोलिसांची...

२५, रा. मुगावली, ता. गुणा, जि. अशोकनगर, मध्य प्रदेश)

या तिघांच्या ताब्यातून ₹८ लाख ८० हजारांची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून उर्वरित रकमेबाबत पुढील तपास सुरू आहे.

अशी होती आरोपींची रेकीची पद्धत

तपासात आरोपींची गुन्हा करण्याची विशिष्ट पद्धत समोर आली आहे. आरोपी प्रथम बँका आणि सोन्याच्या दुकानांमध्ये जाऊन ग्राहकांवर लक्ष ठेवत रेकी करतात. टोळीतील एक जण बँकेमध्ये तर दुसरा वाहनासह बाहेर थांबून हालचालींवर लक्ष ठेवतो. ग्राहक मोठी रक्कम घेऊन बाहेर पडताच त्यांचा पाठलाग करून संधी साधून चोरी केली जाते. आरोपी मोटारसायकलचा वापर करतात, हेल्मेट घालतात आणि गुन्ह्यापूर्वी किंवा गुन्ह्यानंतर कोणत्याही लॉजमध्ये न थांबता तातडीने राज्याबाहेर पसार होतात.

**नागरिकांनी घ्यावी विशेष काळजी : पोलिसांचे आवाहन**

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. मोठी रक्कम शक्यतो एकट्याने वाहून नेऊ नये, ऑनलाइन व्यवहारांना प्राधान्य द्यावे, बँकेतून पैसे काढल्यानंतर अनावश्यक ठिकाणी थांबू नये, रोख रक्कम उघडपणे दाखवू नये आणि मोठी रक्कम असल्यास विश्वासू व्यक्तीला सोबत घ्यावे, असे त्यांनी सांगितले. तसेच बँक परिसरातील संशयास्पद व्यक्तींची माहिती तात्काळ पोलीस ठाणे किंवा डायल ११२ वर देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. बँक सुरक्षा रक्षकांनीही संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किरण बिडवे, सहायक पोलीस निरीक्षक राहुल बांगर, पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत, तसेच पोलीस अंमलदार संदीप भुतेकर, संतोष बनकर, किशोर मोरे, उमेश टेकाळे आणि शिवाजी जाधव यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

### जागतिक कावीळ...

आरोग्य संघटनेने २०३० पर्यंत कावीळ निर्मूलनाचे उद्दिष्ट निश्चित केले असून, ते साध्य करण्यासाठी जनजागृती, लसीकरण आणि लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान जिल्हा रुग्णालयातील सुमारे १०० वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कावीळ प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. या उपक्रमात सनराईज रेस्टॉरंटचे संचालक मोहन इंगळे, डॉ. प्रदीप कुलकर्णी, डॉ. प्रकाश पाटोदेकर, डॉ. प्रशांत बांदल, डॉ. रवींद्र बेदरकर, डी. एच. बोर्डे, नितीश जाधव, संदीप लुखे, संतोष इंगळे, विद्या म्हस्के, चंद्रकांत मुंढे, विजय पवार, कांबळे, अमोल पेरकर, सोनाजी भुतेकर, दीपक जाधव तसेच जिल्हा परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जालना येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### इतिहास महाराष्ट्राचा...

महोत्सवाचा मुख्य विषय लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित आहे. त्यांच्या पराक्रम, न्यायप्रियता, प्रजाहितदक्ष राज्यकारभार, शिक्षणविषयक दूरदृष्टी आणि समाजहितासाठी केलेल्या कार्यातील विविध प्रसंगांचे प्रभावी नाट्यरूप सादरीकरण स्पर्धकांकडून सादर करण्यात येणार आहे.

या महोत्सवात *एकपात्री अभिनय, नाट्यछटा, स्वगत तसेच समूह नाट्य सादरीकरण* अशा विविध प्रकारांमध्ये स्पर्धा होणार आहे.

स्पर्धेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे एकल गट क्र. १ : इयत्ता १ ली ते ५ वी, एकल गट क्र. २ :इयत्ता ६ वी ते १० वी, समूह गट क्र. ३ :* इयत्ता १ ली ते १० वी, एकल सादरीकरणासाठी ३ ते ५ मिनिटे, तर समूह सादरीकरणासाठी *५ ते ८ मिनिटांचा* कालावधी निश्चित करण्यात आला आहे. जालना शहर व जिल्ह्यातील सर्व शाळा, पालक, शिक्षक आणि बालकलाकारांनी या राज्यस्तरीय महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महाराष्ट्राचा प्रेरणादायी इतिहास रंगभूमीवर जिवंत करावा, असे आवाहन *बालरंगभूमी परिषद, जालना शाखेच्या अध्यक्षा वैशाली शालिग्राम दाभाडे* यांनी केले आहे.

### कर्जदाराच्या मृत्यूनंतर...

त्याच्या मृत्यूच्या दिवशी विमा योजनेअंतर्गत पूर्णपणे संरक्षित मानण्याचे निर्देश दिले. तसेच विमा कंपनीला १६,००० रुपयांच्या हप्त्याविरुद्ध मिळणारी संपूर्ण विमा संरक्षण रक्कम ५% व्याजासह देण्याचे आणि या रकमेतून मृत कर्जदाराचे थकीत कर्ज वसूल करून वारसांकडून कोणतीही जबरदस्ती वसुली न करण्याचे आदेश दिले.

याशिवाय तक्रारदारांना झालेल्या मानसिक त्रासापोटी २ लाख रुपये आणि कायदेशीर खर्चासाठी ३०,००० रुपये संयुक्तपणे भरपाई म्हणून ४ आठवड्यांच्या आत देण्याचे आदेश बँकेला दिले आहेत.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ज्येष्ठ वकील ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, बँका आणि विमा कंपन्या अनेकदा स्वतःच्या अंतर्गत त्रुटी लपवण्यासाठी सामान्य ग्राहकांचे शोषण करतात. कर्ज घेताना प्रीमियम कापून घेणे आणि संकट काळात जबाबदारी टाळण्यासाठी तो परत दाखवणे ही अत्यंत गैरकायदेशीर पद्धत आहे. या निर्णयामुळे ग्राहकांना मोलाचा धडा मिळाला असून, कर्ज घेताना विम्याचा हप्ता कापला गेल्यास त्याचे पासबुक स्टेटमेंट किंवा पावती पुरावा म्हणून जपून ठेवावी, बँकेच्या अशा कोणत्याही एकतर्फी निर्णयाला न घाबरता विरोध करावा आणि बँक व विमा कंपनीतील अंतर्गत त्रुटींचा फटका सहन न करता ग्राहक आयोगाचा दरवाजा ठोठावावा.

# गुरूंचे आणि गुरुपौर्णिमेचे महत्त्व

आषाढ पौर्णिमा; म्हणजेच साधक, शिष्य ज्या दिवसाची अत्यंत आतुरतेने वाट पहात असतो, तो गुरुपौर्णिमेचा मंगलमय दिवस ! शिष्याच्या संपूर्ण जीवनाला व्यापून राहिलेल्या सर्वशक्तीमान आणि सर्वज्ञ गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, साधनेचे पुढील ध्येय गाठण्याचा निश्चय करण्यासाठी हा दिवस साधक अन् शिष्य यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. गुरूंच्या कृपेने शिष्याचे परममंगल होते म्हणजेच त्याची आध्यात्मिक उन्नती होते. गुरुपौर्णिमेच्या शुभदिनी गुरुतत्त्व नेहमीच्या तुलनेत १ हजार पटींनी कार्यरत असते. सनातन संस्थेद्वारा संकलित या लेखात आपण गुरूंचे आणि गुरुपौर्णिमेचा उद्देश आणि महत्त्व, गुरुपौर्णिमा साजरा करण्याची पद्धत याविषयी पहाणार आहोत.

गुरूंचे महत्त्व : गुरुदेव ते आहेत, जे साधना सांगतात, साधना करून घेतात आणि आनंदाची अनुभूती देतात. गुरुंचे लक्ष शिष्याच्या भौतिक सुखाकडे नसून, केवळ त्याच्या आध्यात्मिक उन्नतीकडे असते. गुरुच शिष्याला साधनेसाठी प्रेरणा देतात, टप्प्याटप्प्याने साधना करून घेतात, साधनेत येणारे अडथळे दूर करतात, साधनेत स्थिर ठेवतात आणि त्याला परिपूर्णतेकडे घेऊन जातात. गुरुंच्या संकल्पाशिवाय इतके मोठे आणि कठीण शिवधनुष्य उचलणे अशक्य आहे. याउलट, गुरुंची प्राप्ती झाल्यास हे कार्य सहज शक्य होते.

श्री गुरुगीतेमध्ये 'गुरु' या संज्ञेची उत्पत्ती पुढीलप्रमाणे वर्णन केली आहे :

गुकारस्त्वन्धकारश्च रुकारस्तेज उच्यते ।
अज्ञानग्रासकं ब्रह्म गुरुरेव न संशयः ।। श्री गुरुगीता

अर्थ : 'गु' म्हणजे अंधार अथवा अज्ञान आणि 'रु' म्हणजे तेज, प्रकाश किंवा ज्ञान. अज्ञानरूपी अंधकार दूर करणारे ब्रह्म म्हणजे गुरुच होत, यात कोणताही संशय नाही. यावरून साधकाच्या जीवनात गुरुंचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे लक्षात येते. म्हणून गुरुची प्राप्ती हेच साधकाचे पहिले ध्येय असते. गुरुची प्राप्ती झाल्यानेच ईश्वरप्राप्ती होते; किंवा असे म्हणता येईल की, गुरुची प्राप्ती होणे म्हणजेच ईश्वरप्राप्ती होय. ईश्वरप्राप्ती म्हणजे मोक्षप्राप्ती, आणि मोक्षप्राप्ती म्हणजे अखंड आनंदावस्था. या अवस्थेपर्यंत गुरुच आपल्याला पोहोचवतात. शिष्याला जीवनमुक्त करणाऱ्या गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरुपौर्णिमा साजरी केली जाते.

गुरुपौर्णिमेचा उद्देश आणि महत्त्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव सर्वत्र आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. गुरु म्हणजे




ईश्वराचे सगुण रूप ! वर्षभर प्रत्येक गुरु आपल्या भक्तांना अध्यात्माचे बोधामृत भरभरून देत असतात. त्या गुरूंच्या प्रती अनन्य भावाने कृतज्ञता व्यक्त करणे, हा गुरुपौर्णिमा साजरा करण्यामागील उद्देश आहे. गुरुपौर्णिमेच्या शुभदिनी दिवशी गुरुतत्त्व (ईश्वरी तत्त्व) नेहमीच्या तुलनेत १ हजार पटीने कार्यरत असते. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने केलेली सेवा आणि त्याग (सत्साठी अर्पण) यांचा इतर दिवसांच्या तुलनेत १ हजार पटीने लाभ होतो; म्हणून गुरुपौर्णिमा ही गुरुकृपेची (ईश्वरकृपेची) एक अनमोल पर्वणीच आहे.

गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्याची पद्धत

सर्व संप्रदायांमध्ये गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा केला जातो. येथे महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, गुरु हे एक तत्त्व आहे. गुरु देहरूपाने जरी वेगवेगळे दिसत असले, तरी गुरुतत्त्व एकच असते. विविध संप्रदायांबरोबरच अनेक संस्था, संघटना आणि पाठशाळांमध्येही गुरुपौर्णिमेचा महोत्सव अत्यंत श्रद्धेने साजरा केला जातो. गुरुपूजनासाठी चौरंग पूर्वपश्चिम दिशेला ठेवावी. शक्य असल्यास चौरंगावर लघुमंडप उभारण्यासाठी केळीचे खांब किंवा केळीची पाने वापरावीत. गुरुंच्या प्रतिमेची स्थापना करण्यासाठी लाकडी देवघर किंवा चौरंगाचा उपयोग करावा. पूजन करताना आपल्या समोर प्रत्यक्ष सद्गुरु विराजमान आहेत, असा भाव ठेवावा. सर्वप्रथम श्री महागणपतींचे आवाहन करून देशकाल कथन करावे. त्यानंतर श्री महागणपतींचे पूजन करून विष्णुस्मरण करावे. त्यानंतर सद्गुरु, म्हणजेच महर्षी व्यास यांचे पूजन करावे. त्यापुढे आदि शंकराचार्य इत्यादींचे स्मरण करून, आपल्या संप्रदायाच्या परंपरेनुसार आपल्या गुरुंच्या गुरुंचे पूजन करावे. या वेळी गुरुंच्या प्रतिमेचे किंवा पादुकांचे पूजनही केले जाते. त्यानंतर आपल्या गुरुंचे पूजन करावे.

गुरु-शिष्य परंपरेचा आदर्श : जेव्हा धर्माला ग्लानी आली, तेव्हा धर्मसंस्थापनेचे कार्य गुरु-शिष्य परंपरेने केले आहे. ही दैवी परंपरा केवळ गुरु आणि शिष्य, अध्यात्म अन्□ मोक्ष यांच्यापुरती मर्यादित नाही, तर विश्वकल्याणासाठी प्रवाहित आहे. गुरु-शिष्य परंपरेने केवळ शिष्याच्या जीवनाचे कल्याण केले आहे, असे नाही, तर धर्मसंस्थापना आणि राष्ट्ररक्षण यांचेही कार्य केले आहे. आजही परमकल्याणकारी गुरुतत्त्व सनातन धर्माच्या रक्षणासाठी, तसेच भारताच्या उत्कर्षासाठी कार्यरत आहे. आपले कर्तव्य हे आहे की, एक व्यक्ती म्हणून केवळ कुटुंबापुरता विचार न करता राष्ट्र आणि धर्म कार्यामध्ये स्वतःला झोकून देणे ! आज आपण गुरु-शिष्य परंपरेच्या प्रवाहात सामावून जाण्यातच आपले हित आहे.

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते' आणि गुरुकृपायोग

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

**संपर्क- ९२८४०२७१८०**

# भविष्य निर्वाह निधीचे (जीपीएफ) वार्षिक विवरणपत्र सेवार्थवर उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

महालेखाकार (लेखा व हक्क)२, महाराष्ट्र, नागपूर यांनी महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) खात्यांचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक विवरणपत्र सेवार्थ प्रणालीवर उपलब्ध करून दिले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी आपल्या जीपीएफ खात्याची माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक त्रुटींची तातडीने दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे प्रधान महालेखाकार (लेखा व हक्क)२, नागपूर कार्यालयाकडे आहेत, त्यांना सेवार्थ पोर्टलवर वार्षिक विवरणपत्र पाहणे, डाउनलोड करणे तसेच त्याची प्रिंट काढणे शक्य आहे. वेळेत माहितीची पडताळणी केल्यास निवृत्तीच्या वेळी भविष्य निर्वाह निधीची रक्कम मंजूर करण्यात होणारा अनावश्यक विलंब टाळता येणार आहे.

महालेखाकार कार्यालयाकडे जीपीएफ लेखे असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवार्थ प्रणालीमध्ये स्वतः चा मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. जीपीएफशी संबंधित ओटीपी तसेच अन्य महत्त्वाचे संदेश नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरच पाठविले जाणार असल्याने ज्यांचा मोबाईल क्रमांक अद्याप नोंदणीकृत नाही, त्यांनी आवश्यक तपशीलासह संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा.

याशिवाय, वार्षिक विवरणपत्रातील नाव, जन्मतारीख व इतर वैयक्तिक माहिती अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. कोणतीही तफावत आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या माध्यमातून सेवार्थ आयडीसह आवश्यक कागदपत्रे सादर करून दुरुस्ती करून घ्यावी.

सेवार्थ पोर्टलवर लॉगिन करण्यासाठी मोबाईल क्रमांक नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. आयडी किंवा पासवर्ड उपलब्ध नसल्यास ' ' या पर्यायाचा वापर करून नवीन संकेतशब्द तयार करता येईल. तसेच कर्मचाऱ्यांनी आपल्या जीपीएफ खात्यात मासिक अभिदानाची नोंद नियमितपणे तपासावी. अभिदानाची रक्कम खात्यात जमा न झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांमार्फत कोषागार प्रमाणपत्र, चलन क्रमांक, दिनांक आणि आवश्यक कागदपत्रांसह माहिती सादर करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांनी वेळेत माहितीची पडताळणी करून आवश्यक त्रुटी दूर कराव्यात, जेणेकरून निवृत्तीच्या वेळी भविष्य निर्वाह निधीची रक्कम मंजूर करताना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, असे आवाहन महालेखाकार (लेखा व हक्क)२, महाराष्ट्र, नागपूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.आवश्यक असल्यास हा मजकूर वृत्तपत्रीय शैलीत अधिक संक्षिप्त किंवा शासनाच्या प्रसिद्धीपत्रकाच्या मानक स्वरूपातही तयार करून देऊ शकतो.

# सरळसेवा परीक्षा पारदर्शक पद्धतीने; गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासन सतर्क

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

कामगार विभागामार्फत माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळातील निरीक्षक, लेखापाल आणि लघुटंकलेखक पदांच्या भरतीसाठी २९ व ३० जुलै २०२६ रोजी ऑनलाइन सरळसेवा परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा छत्रपती संभाजीनगर येथील आयऑन डिजिटल झोन, चिकलठाणा तसेच आयऑन डिजिटल झोन, आयसीईईएम कॉलेज कॅम्पस, वाळूज या दोन परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे.

परीक्षा शांततापूर्ण, सुरक्षित आणि पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार परीक्षा केंद्र परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आवश्यक प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

कामगार आयुक्तालयाने उमेदवारांना आवाहन केले आहे की, ही परीक्षा मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) यांच्या माध्यमातून पूर्णपणे ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने घेण्यात येणार आहे.

त्यामुळे परीक्षा, निवड किंवा गुण वाढवून देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेच्या भूलथापांना बळी पडू नये.

परीक्षा प्रक्रियेदरम्यान कोणताही गैरप्रकार, संशयास्पद हालचाल अथवा फसवणुकीचा प्रयत्न निदर्शनास आल्यास त्याची तात्काळ माहिती पोलीस प्रशासनाला द्यावी. परीक्षेची पारदर्शकता, विश्वासार्हता आणि पवित्रता कायम राखण्यासाठी सर्व उमेदवारांनी व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन कामगार आयुक्तालयाने केले आहे.

# श्री बडेबाबा मच्छिंद्रनाथ देवस्थानात भव्य गुरुपौर्णिमा महोत्सव

## बुधवारी विविध धार्मिक कार्यक्रम तर गुरुवारी महाप्रसादी

**जालना -प्रतिनिधी**

गुरु पौर्णिमेनिमित्त जालना शहरातील रेल्वे स्टेशन रोड येथील श्री बडेबाबा मच्छिंद्रनाथ देवस्थानात भव्य गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात २८ जुलै बुधवारी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे. ज्यामध्ये सकाळी ११ वाजता गादी पूजन, दुपारी १ वाजता गुरु पूजन, सायंकाळी ७ वाजता महाआरती आणि रात्री ८ वाजता भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे. तसेच दि. ३० जुलै गुरुवारी दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री बडे बाबाची मच्छिंद्रनाथ देवस्थानाचे मठाधीश गुरुवर्य श्री विश्वनाथजी महाराज यांच्या पावन सानिध्यात हे सर्व धार्मिक विधी पार पाडले जाणार आहे. गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर गुरू-शिष्य परंपरेचे



जतन आणि अध्यात्मिक संस्कार वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बडे बाबाची मच्छिंद्रनाथ देवस्थानाचे मठाधीश गुरुवर्य श्री विश्वनाथजी महाराज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शर्यत अजून संपलेली नाही

आज महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. तरीही सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचताना अद्यापही अनेक अदृश्य अडथळे उभे राहतात. संधीची समानता, गुणवत्तेचा सन्मान आणि निर्णय घेणाऱ्यांची मानसिकता या तीन गोष्टींची खरी परीक्षा याच टप्प्यावर होते. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांच्या अलीकडील वक्तव्याने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. महिलांना संधी मिळवण्यासाठी अजूनही लढावंच लागतं? या प्रश्नाचं उत्तर शोधताना सुधा मूर्ती यांच्या आयुष्यातील एक प्रसंग आपल्याला सांगून जातो की, शर्यत महिलांच्या क्षमतेची नसून त्यांना समान संधी देणाऱ्या समाजाच्या मानसिकतेची आहे आणि ती शर्यत अजून संपलेली नाही. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॉन्डोलीझा रईस यांच्याशी संवाद साधताना असे वक्तव्य केले की, ''मी अमेरिकेबाहेरील कोणत्याही देशात, भारतातसुद्धा, सीईओ होऊ शकले नसते. कारण अमेरिकेची व्यवस्था गुणवत्तेला प्राधान्य देते. येथे मार्गदर्शक तुम्ही पुरुष आहात की महिला, तुमची जात, वंश किंवा पार्श्वभूमी काय आहे, यापेक्षा तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमता महत्त्वाची मानतात.'' या वक्तव्यानंतर भारतात मोठी चर्चा रंगली. काहींनी नूयी यांच्या मताशी सहमती दर्शवत भारतात अजूनही महिलांना सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचताना अनेक संरचनात्मक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, असे म्हटले, तर अनेकांनी त्यांच्या विधानावर टीका करत भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांसाठी वाढलेल्या संधींकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे मत व्यक्त केले. दुसरी गोष्ट भारतात जिथे महिला काम करतात तिथले वरिष्ठ महिलांविषयी काय विचार करतात किंवा त्यांचं मत काय असू शकतं हे देखील महत्त्वाचे आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर मला एक किस्सा आठवतो. महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, ''देशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही.'' हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारततही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही.

झाडे लावा झाडे जगवा



# जालना शहर महानगरपालिका, जालना

प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड, जुना जालना, ४३१२१३ फोन नं ०२४८२-२३०३५०
Email Id-comcjalna@gmail.comWebsitejalnamahaulb.maharashtra.gov.in

जा. क्र./ जाशमनपा/विवि/२०२६/३६० दिनांक २८/०७/२०२६

## जालना शहर महानगरपालिका

निविदा सुचना क्र. ३६० दिनांक -२८-०७-२०२६

या जाहिर सुचनेव्दारे विद्युतविभाग जालना शहर महानगरपालिका मार्फत मनपा निधी २०२५-२६ अंतर्गत छत्रपती संभाजी महाराज येथे खालील कामांकरीता संबंधित नोंदणीकृत विद्युत कंत्राटदार यांचेकडुन व्दि लिफाफा पध्दातीने दरपत्रके मागविण्यासाठी दै. वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम जीएसटी सह |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | Providing & Installation Main Power Supply to Undar Pass Railway Bridge near Railway Station Jalna Municipal Corporation | 730593 |

१. वरील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटदार यांचे कडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.सर्व बंद लखोट्यातील दरपत्रके पुरवठदारानी दिनांक २९-०७-२०२६ ते दिनांक ०४-०८-२०२६ पर्यंत कार्यालयीन कामाकाजाच्या वेळेत विद्युत विभाग जालना शहर महानगरपालिका, जालना येथे दाखल करावे.

२. कंत्राटदाराकडील उक्त कामा करीता दर भरुन पाठविलेल्या बंद लखोट्यातील दरपत्रके दिनांक ०४-०८-२०२६ रोजी सांयकाळी ५.०० वाजे पर्यंत स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशीच उघडण्यात येईल.

३. उपरोक्त कामाची कोरी निविदा तसेच अनुषंगिक अटी व शर्थीची माहिती म.न.पा कार्यालय विद्युत विभाग येथे उपलब्ध असुन इच्छुकांनी कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहुन हस्तगत करुन घ्यावी.

३. उशिरा प्राप्त निविदा स्विकारले जाणार नाहीत. निविदा मध्ये भरलेल्या दरा व्यतिरिक्त दर या कार्यालयास मान्य राहणार नाही. कोणतेही एक किंवा अन्य सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता मंजुर किया नामंजुर करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवले आहे.

| | | |
|---|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **उप अभियता** | **मुख्य लेखाधिकारी** | **आयुक्त** |
| **जालना शहर महानगरपालिका** | **जालना शहर महानगरपालिका** | **जालना शहर महानगरपालिका** |





''तारावर रांग लावून बसलेल्या या चिमण्या, जणू निसर्गाच्या शाळेतील गुणी विद्यार्थिनीच! ना घंटा, ना वर्गखोली, ना शिक्षकांची हाक... तरीही शिस्त, एकता आणि सहजीवनाचा सुंदर धडा देत आहेत.'' एका मागोमाग एक शिस्तीत बसलेल्या या चिमुकल्या जीवांनी, शब्दांविना शिकवला एकतेचा, संयमाचा आणि सहजीवनाचा धडा. चिमण्यांची शाळा भरल्याचे मनोहारी दृश्य!' **छायाचित्र किरण खानापुरे**

# मुंबईत पालकमंत्री पंकजा मुंडे यांची आ. अर्जुनराव खोतकर यांची सदिच्छा भेट


## वाढदिवसानिमित्त शाल, पुष्पगुच्छ देऊन व्यक्त केल्या शुभेच्छा

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री आणि जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबई येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव (पंडितदादा) भुतेकर उपस्थित होते.

यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. त्यांच्या निरोगी, दीर्घ आणि यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत जालना जिल्ह्याच्या विकासासह राज्यातील विविध विकासकामांना त्यांच्या नेतृत्वाखाली अधिक गती मिळावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना आमदार खोतकर म्हणाले, ''आई तुळजाभवानीच्या कृपेने आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख, समृद्धी आणि जनसेवेच्या कार्यात अखंड यश लाभो, हीच मनःपूर्वक प्रार्थना. आपल्या नेतृत्वाखाली राज्य आणि जालना जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळत राहो.''

शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर यांनीही पालकमंत्री पंकजा मुंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. भेटीदरम्यान विविध विषयांवर आपुलकीच्या वातावरणात संवाद झाला.



# शिवसेना उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त चित्र कला स्पर्धेचे आयोजन

**जालना – प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे व मनिष श्रीवास्तव यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे या विषयावर व्यंगचित्र, आठवणीतील बाळासाहेब, बाळासाहेबांचे व्यक्तिमत्व चित्र, पेन्सिल चित्र या स्पर्धेचे आयोजन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. शाळा, कॉलेजमध्ये विद्यार्थ्याकडून शिवसेना बाळासाहेब ठाकरे या विषयावर चित्र काढून चित्रप्रदर्शन भरवणार आहेत. उत्कृष्ट चित्र काढणाऱ्या विद्यार्थी -विद्यार्थिनींना रोख बक्षीस, प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

चित्र कला मार्गदर्शन अरविंद देशपांडे हे करत आहेत अशी माहिती शिवसेना शहरप्रमुख दीपक रणनवरे यांनी दिली आहे. तरी आपण काढलेले चित्र ३ ऑगष्टपर्यंत अरविंद देशपांडे, दीपक रणनवरे (९३७२७५९४९९) आयोजकाकडे जमा करावे. यासाठी शिवसेना शहरप्रमुख दीपक रणनवरे, महिला जिल्हा संघटक रुपण घुगे, शिवसेना शहरप्रमुख संदीप झारकंडे,शिवसेना शहरसंघटक चेतन भुरेवाल, अल्पसंख्याक शहरप्रमुख वशिम खान, उपशहरप्रमुख डॉ. राजेश राऊत, संतोष क्षत्रिय, विभागप्रमुख तुकाराम भुतेकर, रईस शेख, उपविभागप्रमुख रमेश सलामपुरे हे या स्पर्धेसाठी परिश्रम घेत आहेत.

# जागतिक कावीळ दिनानिमित्त जालना शहरात जनजागृती रॅली

**जालना – प्रतिनिधी**

जागतिक कावीळ दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय, जालना आणि सनराईज शुद्ध शाकाहारी रेस्टॉरंट, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी जालना शहरात कावीळ आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र एस. पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.



''चला तर कावीळ मुक्त करूया'' या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीद्वारे नागरिकांना कावीळ आजाराची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर निदान आणि उपचार याबाबत माहिती देण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गावरून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते..

यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांनी सांगितले की, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कावीळ आजार नियंत्रणासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. जागतिक *(पान २ वर)*

# परतुर पंचायत समिती येथे ऊसतोड कामगारांना स्मार्ट कार्डांचे वितरण

**परतुर – प्रतिनिधी**

पंचायत समिती, परतुर येथे गटविकास अधिकारी कैशल्य पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ऊसतोड कामगारांना स्मार्ट कार्डांचे वितरण करण्यात आले. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, व छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून घनसावंगी तालुक्यातील १५ व परतूर तालुक्यातील १५ अशा एकूण ३० गावांमध्ये ऊसतोड कामगार कुटुंबातील महिला व मुलांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण, पोषण आणि सुरक्षित स्थलांतर या



विषयांवर प्रकल्प राबविण्यात येत आहे. यावेळी संबंधित गावांचे ग्रामसेवक, ऊसतोड कामगार तसेच प्रकल्प कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत ऊसतोड कामगारांचे स्थलांतर होण्यापूर्वी नोंदणी करणे, स्मार्ट कार्ड व ओळखपत्रांचे वितरण करणे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र कामगारांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक समन्वय साधण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी, कैशल्य पाटील.विस्तार अधिकारी, ई. टी.मुरदकर. कनिष्ठ लिपीक, दत्ता राउत. जिल्हा समन्वयक, एकनाथ राऊत.महादेव खरात. यांच्या सह ऊसतोड कामगार आणि ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांची अधिकृत नोंदणी सुलभ होण्यास, सुरक्षित स्थलांतरास चालना मिळण्यास तसेच शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# ग्रामीण भागातील दिपक जाधवची महाराष्ट्र फुटबॉल संघात निवड

## *महाराष्ट्र क्रीडा प्रबोधिनी, पुणे येथे निवडीने पळसखेडा कैलासनगर गावाचा मान उंचावला*

**जालना – प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील पळसखेडा कैलासनगर या ग्रामीण भागातील होतकरू फुटबॉलपटू दिपक मच्छिंद्र जाधव यांची महाराष्ट्र क्रीडा प्रबोधिनी, पुणे येथे महाराष्ट्र राज्य फुटबॉल संघात निवड झाल्याने गावासह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लहानपणापासून फुटबॉलची आवड जोपासत दिपक यांनी सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील मर्यादित सुविधा असूनही त्यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर राज्यस्तरावर स्थान मिळविले आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंनाही मोठी प्रेरणा मिळाली आहे.



दिपक यांच्या निवडीबद्दल गावातील ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे आणि भारताचे प्रतिनिधित्व करून उज्ज्वल कामगिरी करावी, अशा शुभेच्छा सर्व स्तरातून व्यक्त होत आहेत.

# इतिहास महाराष्ट्राचा... बालकलाकारांच्या कलेतून उलगडणार!

**दत्ता देशमुख**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न बालरंगभूमी परिषद, जालना शाखेच्या* वतीने आयोजित इतिहास महाराष्ट्राचा २०२६ या राज्यस्तरीय महोत्सवाची जालना जिल्हास्तरीय प्राथमिक फेरी रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी जालना येथे आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या स्पर्धकांची अंतिम फेरी दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे होणार आहे.

महाराष्ट्राच्या भूमीला शौर्य, त्याग, न्याय आणि सुशासनाचा गौरवशाली वारसा लाभला आहे. हा दैदीप्यमान इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान व जिज्ञासा निर्माण व्हावी तसेच बालकलाकारांना आपल्या अभिनय कौशल्याचे हक्काचे व्यासपीठ मिळावे, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे.

यंदाच्या *(पान २ वर)*

# शिष्यवृत्तीतील गुणवंत व आदर्श शिक्षकांचा सत्कार



**मंठा – प्रतिनिधी**

पाटोदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २८ जुलै २०२६ रोजी इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी अर्णव भागवत डोळझाके, यश काशिनाथ दळवे व स्वरूपा शिवाजी बोराडे तसेच वर्गशिक्षिका श्रीमती गीता बरसले यांचा सत्कार करण्यात आला. याचवेळी केंद्रप्रमुख महेशकुमार चौधरी व प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांना प्राप्त झालेल्या मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीएमश्री प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकिशोर पारस्कर होते. यावेळी शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सनातन संस्थेतर्फे 'गुरुपौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन

**जालना- प्रतिनिधी**

जालना- सनातन संस्थेतर्फे बुधवार, दि. २९ जुलै रोजी 'गुरुपौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव सायंकाळी ७ वाजता अंबड तालुक्यातील मार्डी येथील सेवानंद महाराज मंदिरात आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व राष्ट्र आणि धर्मप्रेमी हिंदूंनी सहकुटुंब या अमूल्य पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सनातन संस्थेने केले आहे.

# कर्जदाराच्या मृत्यूनंतर विमा हप्ता परत करणाऱ्या बँकांना ग्राहक आयोगाचा मोठा झटका; भरपाईसह कर्जमाफीचा ऐतिहासिक निकाल

**जालना – प्रतिनिधी**

कर्जदाराच्या खात्यातून विम्याचा हप्ता कपात केल्यानंतर, त्याच्या मृत्यूनंतर तो हप्ता बेकायदेशीरपणे परत दाखवून विमा दावा नाकारणाऱ्या बँक आणि विमा कंपनीला जिल्हा ग्राहक आयोगाने मोठा दणका दिला आहे. बँक आणि विमा कंपनीच्या अशा मनमानी कारभाराला सेवा दोष आणि अनुचित व्यापार पद्धती ठरवत आयोगाने मृत कर्जदाराला विमा संरक्षण मिळालेले मानण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मृत कर्जदाराच्या थकीत कर्जाची रक्कम विमा दाव्यातून वसूल करून वारसांना मानसिक त्रासापोटी नुकसानभरपाई देण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय सुनावला आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, कुपवाडा येथील व्यावसायिक मोहम्मद अयुब दार यांनी त्यांच्या न्यू ब्रँड रेडीमेड गारमेंट्स या व्यवसायासाठी जम्मू अँड काश्मीर बँकेच्या कुपवाडा शाखेतून कॅश क्रेडिट कर्ज घेतले होते. बँकेच्या अटीनुसार कर्ज सुरक्षित करण्यासाठी बँकेने ६ मे २०२२ रोजी त्यांच्या खात्यातून १६,००० रुपयांची विम्याची रक्कम कपात केली. मात्र, दुर्दैवाने १ जून २०२२ रोजी मोहम्मद अयुब दार यांचे निधन झाले. कर्जदाराच्या निधनाची माहिती मिळताच बँकेने आपली जबाबदारी झटकण्यासाठी २४ जून २०२२ रोजी कपात केलेला हप्ता पुन्हा मृत कर्जदाराच्या खात्यात जमा केला आणि विमा संरक्षण अस्तित्वातच नसल्याचा पवित्रा घेतला. यानंतर बँकेने त्यांच्या असहाय्य वारसांकडे कर्जाच्या वसुलीसाठी तगादा लावण्यास सुरुवात केली, ज्यामुळे संतप्त झालेल्या वारसांनी (पत्नी शाहजादा बेगम आणि तीन लहान मुले) जिल्हा ग्राहक निवारण आयोगात दाद मागितली.

जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष पीरजादा कौसर हुसेन आणि सदस्य नायला यासीन यांच्या पीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. बँकेच्या वतीने विमा पॉलिसी पूर्ण झाली नव्हती असा बचाव करण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र आयोगाने सर्व पुरावे पडताळून पाहत बँकेचा युक्तिवाद फेटाळून लावला. आयोगाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, एकदा खात्यातून विम्याची रक्कम कपात करून कर्जदाराची नोंदणी केली गेल्यानंतर, कर्जदाराच्या मृत्यूनंतर बँकेला एकतर्फी तो प्रीमियम परत करण्याचा कोणताही अधिकार नाही. बँक आणि विमा कंपनीतील अंतर्गत प्रशासकीय त्रुटींचा फटका ग्राहकाला किंवा त्याच्या वारसांना बसू शकत नाही. हप्ता कपात झाल्यामुळे ग्राहकाची विमा संरक्षण मिळाल्याची रास्त अपेक्षा निर्माण झाली होती, त्यामुळे निधनानंतर हप्ता परत करून विमा हक्क नाकारणे हा गंभीर सेवा दोष आहे. आयोगाने तक्रारदारांच्या बाजूने निकाल देत मृत कर्जदाराला *(पान २ वर)*

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

**जालना –प्रतिनिधी**

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे शुक्रवार, दि. ३१ जुलै, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला समितीवर नियुक्त शासकीय सदस्य, अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांचे ग्राहक हितासंबंधीत तक्रार असल्यास सदर बैठकीच्या दिवशी उपस्थित राहून आपला लेखी स्वरुपाचा अर्ज सादर करावा.

नागरिकांना ग्राहक या संबंधाने काही अडचणी असल्यास त्याबाबत जालना जिल्ह्याचे संकेतस्थळ jalna.nic.in यावर ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करुन दिलेले असून, नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जालना संरक्षण परिषदेचे सदस्य सचिव शशीकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.